महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र – ई-एफएमएस प्रणाली साठी वापरण्यात येणा-या डीजीटल सिग्नेचर व्यवस्थापनाबाबत.

जा.क्र. आमगांराग्रारोहयो/परिपत्रक/ /2013
आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना महाराष्ट्र, नागपूर
दिनांक 24.12.2013

# परिपत्रक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत करावयाची प्रदाने आता ई-एफएमएस प्रणाली व्दारे करण्यात येत आहेत. यासाठी डिजीटल सिग्नेचर नरेगा सॉफ्ट वर नोंदवून त्याचा वापर करावा लागतो. या अनुषंगाने डिजीटल सिग्नेचर व्यवस्थापनाबाबत या कार्यालयाचे पत्रक क्र.आयुक्त/मगांराग्रारोहयोमहा/आस्था/1087/2013 दिनांक 5/9/2013 अन्वये सुचना निर्गमीत करण्यात आल्या होत्या त्या कायम ठेवून खालील प्रमाणे सविस्तर सूचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

1. डिजीटल सिग्नेचर वगळणीचा प्रस्ताव पाठविण्यापूर्वी बँक/पोस्ट/सहकारी बँकेचा कोणताही एफटीओ कोणत्याही स्तरावर प्रलंबीत नसल्याची खात्री करून घेवूनच प्रस्ताव पाठविण्यात यावा. म्हणजेच अकाउंटट किंवा पीओ लॉगइन मध्ये, तसेच बँक/पोस्ट ऑफिस/सहकारी बँक स्तरावर एफटीओ प्रलंबीत नसावा. सर्व एफटीओ निकाली निघालेले असावे. याबाबतचे प्रमाणपत्र नोदवूनच प्रस्ताव पाठविण्यात यावा. प्रस्तावामध्ये डिएससी धारकाचे नाव, पदनाम, मोबाईल क्रमांक व संबंधित काम्पुटर ऑपरेटरचे नाव व मोबाईल क्रमांक नोंदवलेला असावा.

2. डिजीटल सिग्नेचर नोंदविल्याच्या दिवशी एफटीओ तयार केल्यास dsc error मेसेज येण्याची शक्यता असते. त्यामुळे डिजीटल सिग्नेचर नरेगा सॉफ्ट वर नव्याने नोंदविल्यानंतर त्याच दिवशी एफटीओ तयार करू नये. किमान दुस-या दिवसापासूनच एफटीओ तयार करण्यास सुरुवात करावी.

3. डिएससी वगळणीनंतर तयार करण्यात आलेला पहिला एफटीओ यशस्वीपणे प्रोसेस झालेला असल्याची खात्री एमआयएस समन्वयक यांनी करावी.

4. काही अधिका-यांकडे विविध योजनांच्या एकापेक्षा जास्त डिएससी असण्याची शक्यता आहे. अशावेळी ज्या डिएससीची नोंद नरेगा सॉफ्ट वर केलेली असेल त्याच डिएससी व्दारे एफटीओ वर स्वाक्षरी करणे गरजेचे आहे. अन्यथा मिसमॅच मेसेज येतो. या संदर्भात आवश्यक खबरदारी घेण्यात यावी.

5. नवीन टोकनमध्ये डिएससी डाऊनलोड करताना संगणकावर योग्य तेच टोकन (डिएससी)व केवळ एकच योग्य टोकन लावलेले असेल याची खात्री करण्यात यावी. एकापेक्षा जास्त अथवा चुकीचे टोकन लागलेले असल्यास चुकीची डिएससी डाऊनलोड/रजीस्टर होण्याची शक्यता असते.

6. एका जिल्हयामध्ये असे निदर्शनास आले की गटविकास अधिका-यांची बदली झाल्यानंतर त्यांनी आपली डिएससी कनीष्ठ कर्मचा-याकडे सोपवीली. नंतर या डिएससीचा वापर करून अनेक एफटीओ वर स्वाक्ष-या करण्यात आल्या. ही बाब सर्वस्वी चुकीची असून गंभीर आहे. याची पुनरावृत्ती टाळणे आवश्यक आहे.

7. डिजीटल सिग्नेचर ही संबंधित अधिका-याची वैयक्तीक मालमत्ता समजण्यात यावी. अधिका-याची बदली झाल्यास सदर डिएससी त्यांनी सोबत घेवून जावी. कोणत्याही अन्य अधिका-याकडे सोपवून जावू नये. अशा प्रकारे चुकीच्या व्यक्तीकडे डिएससी दिल्यास व त्याचा गैरवापर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित डिएससी धारकाची राहील. असा अधिकारी मगांराग्रारोहयोशी संबंधित पदावर बदलून गेल्यास सदर डिएससी नवीन पदावर देखील नोंदवून वापरता येईल. अधिकारी अन्य पदावर बदलून गेला व त्यास डिजीटल स्वाक्षरीची आवश्यकता नसल्यास त्यांनी अशी डिएससी रिव्होक करून घ्यावी. ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील.

8. वरील अ.क्र. 6 मध्ये दर्शविल्यानुसार जिल्हयातील कोणत्याही डिएससी धारक अधिका-याची बदली झाल्यानंतर लगेच तातडीने डिएससी वगळणी करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा. गटविकास अधिकारी नरेगा हे अशा प्रकारे अहवाल पाठविण्यास जबाबदार राहातील.

9. जिल्हयातील कोणत्याही गटविकास अधिकारी अथवा सहायक लेखाअधिकारी रजेवर अथवा बदलून गेल्यास जिल्हा परिषद कार्यालयातील गटविकास अधिकारी नरेगा अथवा सहायक लेखा अधिकारी यांना एफटीओ वर डिजीटल स्वाक्षरी करण्यासाठी शासन निर्णयाव्दारे प्राधिकृत करण्यात आलेले आहे. तथापी या दोन्ही प्राधिका-याकडे डिएससी उपलब्ध नसल्यास जिल्हयातील अन्य कोणत्याही गटविकास अधिकारी अथवा सहायक लेखा अधिकारी ( शक्य असल्यास जिल्हा मुख्यालयाच्या तालुक्याचे अधिकारी) यांना प्राधिकृत करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी या

कार्यालयास पाठविण्यात यावा. या कार्यालयाकडून अशा प्रस्तावास मान्यता प्राप्त करून घेतल्यानंतर सदर प्राधिकृत अधिकारी आपली डिएससी वापरून एफटीओ डिजीटली साईन करू शकतील.

10. काही वेळा तांत्रीक अडचणी अथवा समस्यांमुळे एफटीओ तयार करून पेमेंट करणे शक्य होत नाही. अशा प्रकरणांचा सविस्तर अभ्यास करून कारण मिमांसेसह उपजिल्हाधिकारी रोहयो यांचे स्वाक्षरीनिशी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. प्रस्तावाची छाननी करून या कार्यालयाकडून आवश्यक सूचना दिल्या जातील.

सर्व जिल्हयांनी उपरोक्त सुचनांनुसार कार्यवाही करावी.

A.M.

आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना महाराष्ट्र,
नागपूर

प्रतिलिपी :- 1) मा.प्रधान सचिव, रोहयो, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - 32 यांना माहितीस्तव सादर
2) जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सर्व
3) उपजिल्हाधिकारी रोहयो व उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत जिल्हा परिषद सर्व
4) एमआयएस समन्वयक व कार्यक्रम व्यवस्थापक सर्व